३. **एस. ई. एस. तंत्रनिकेतन माजी विद्यार्थी संघ, सोलापूर** बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळाच्या सदरहू संस्थेची व्यवस्था या कारभार सोपवण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नांवे, पत्ते, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रियत्व खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं | सभासदांचे नांव | पत्ता | पद | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. अजय अनिल येळेगावकर | ४१२, प्लॉट नं. २९, अजिंक्य, जिमखाडी, सोलापूर | अध्यक्ष | ३८ | भारतीय | नोकरी |
| २. | सौ. श्वेता दत्तात्रय वोलावतीन | १४२५, दाजी पेठ, सोलापूर | उपाध्यक्ष | २५ | भारतीय | नोकरी |
| ३. | श्री. भगवान दत्तात्रय क्षिरसागर | १८, गुरुवार पेठ, सोलापूर | सचिव | ४५ | भारतीय | नोकरी |
| ४. | श्री. संदीप गुरुलिंग कळुरकर | ८/बी, जवान नगर, विजापूर रोड, सोलापूर | सहसचिव | ४२ | भारतीय | नोकरी |
| ५. | श्री. प्रसाद सुरेश कुलकर्णी | मु.पो. सांगोला, पंचायत समिती समोर, सांगोला, जि. सोलापूर | खजिनदार | ३४ | भारतीय | नोकरी |
| ६. | श्री. गणेश सुरेश विभुते | १७५/ऽ/५बी, गणेश नगर, भवानी पेठ, सोलापूर | सदस्य | ४४ | भारतीय | नोकरी |
| ७. | श्री. श्रीकांत जयप्रकाश मकूर | ६०/६१, साखर पेठ, सोलापूर | सदस्य | ४८ | भारतीय | नोकरी |
| ८. | श्री. श्रीपाद गुंडोपंत कोर्टीकर | ए २५, श्रध्दा, द्वारका नगर, विजापूर रोड, सोलापूर | सदस्य | ४२ | भारतीय | नोकरी |
| ९. | श्री. गंगाधर प्रकाश हुलसुरे | ४ बी, कुमार नगर, विजापूर रोड, सोलापूर | सदस्य | ३४ | भारतीय | नोकरी |
| १०. | श्री. संतोष केशवराव सरवदे | ३५/२६१, बापूजी नगर, सदर बझार, सोलापूर | सदस्य | ४० | भारतीय | नोकरी |
| ११. | श्री. विशाल वसंत जोग | नेहा अपार्टमेंट, डी /५/ सी, माणिक, होटगी रोड, सोलापूर | सदस्य | ४२ | भारतीय | नोकरी |

स्थळ :- सोलापूर

दिनांक :- / /२०१६

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

११/१२/१६

परिशिष्ट - अ

दि. १५/१२/२०१६

प्रति,
मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सोलापूर विभाग, सोलापूर

विषय :- संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे अन्वये नोंदणीबाबत.......

संस्थेचा नांव व पत्ता : -

## एस. ई. एस. तंत्रनिकेतन माजी विद्यार्थी संघ, सोलापूर

बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर

महोदय,

निवेदन करण्यात येते की, वरील विषयांस नमूद केलेल्या संस्थेची नोंदणी होण्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करावयाची आहे. सबब, आपणांकडे खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१) विधानपत्र (ज्ञापन) मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन.
२) नियम व नियमावलीची सत्यप्रत असे.
३) संस्थेच्या पत्यात व नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांचे संमतीपत्र.
४) संस्थेच्या पत्यात व नोंदणीबाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहीनिशी अधिकार पत्र.
५) संस्थेच्या पत्यात व मालमत्ते बाबत अध्यक्ष व सचिव यांचे प्रतिज्ञापत्र रुपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवर रु ५ चे पैसे कोर्ट फी स्टॅम्पसह.

पुढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील संस्थेचे सर्व उद्देश सन १८६० अन्वये संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे असून संस्थेच्या नावाची वा नामसदृश्य असलेली अन्य संस्था माझे माहितीप्रमाणे अस्तित्वात नाही. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी शुल्क १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती.

आपला विश्वासु,

श्री. भगवान दत्तात्रय शिरसागर
अर्जदार

प्रत ... मिळाली
...12/16
... कार्यालय
...पूर.

सहपत्रे : वरीलप्रमाणे.

## परिशिष्ट - ब

# एस. ई. एस. तंत्रनिकेतन माजी विद्यार्थी संघ, सोलापूर

बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर

**या संस्थेचे ज्ञापन मेमोरेण्डम ऑफ असोसिएशन**

१. संस्थेचे नांव :- **एस. ई. एस. तंत्रनिकेतन माजी विद्यार्थी संघ, सोलापूर**

२. संस्थेचा पत्ता :- बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर

३. संस्थेचे उद्देश :- खालीलप्रमाणे राहतील.

१) एस.ई.एस तंत्रनिकेतन, सोलापूरच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, बंधुभाव, ऐक्य वाढीस लावणे व आदर्श नागरिक निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे. विद्यार्थी आणि तंत्रनिकेतन यांच्यामध्ये दुवा म्हणून काम करणे व नविन विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे. गरिब व गरजू विद्यार्थ्यांना सहाय्य करणे. त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना चालना मिळणेसाठी विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन करणे व विविध क्रिडा, सांस्कृतिक व शैक्षणिक स्पर्धांचे आयोजन करणे. माजी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा व शैक्षणिक गुणवत्तेचा उपयोग नविन विद्यार्थी आणि एस.ई.एस तंत्रनिकेतन यांच्या विकासासाठी लाभ करून देणे.

२) **सांस्कृतिक :-**

सर्व प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रम करणे, उदा. कलापथक, नाट्य, एकांकिका, गायन, वादन, कथ्थक, मणिपुरी, भरत नाट्यम, यांच्या तालुका पातळीवर, जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करणे. साहित्य आणि सांस्कृतिक अभिवृध्दीसाठी प्रयत्न करणे. गणेश उत्सव नवरात्र उत्सव, साजरे करणे व सर्व सांस्कृतिक कार्यक्रम व उत्सवांचे आयोजन करणे. नाट्यलेखनासाठी मार्गदर्शन शिबिरे घेणे. अभिनयाचे प्रशिक्षण देणे. शिबिरे घेणे, नाटक या विषयाच्या सर्व अंग आणि उपांगाचे मार्गदर्शन, प्रशिक्षण देणे, प्रत्यक्ष नाटक व एकांकिका बसविणे. स्पर्धा घेणे, स्पर्धेत भाग घेणे. साहित्य, नाट्य, काव्य यांची आवड वाढीस लागावी यासाठी विविध ग्रंथ, पुस्तके जमविणे. प्रशिक्षण वर्ग, शिबिरे भरविणे. विविध साहित्य पुरस्कार देणे. नृत्य, नाट्य, काव्य इत्यादि कलांचे प्रशिक्षण देणे व स्पर्धा आयोजित करणे.

३) **क्रिडा :-**

वेगवेगळ्या खेळाचे सामने भरविणे व त्यात भाग घेणे. कोचींग कॅम्प आयोजित करणे. व्यायामशाळा चालविणे. व्यायामाचे व योगासनाचे प्रशिक्षण देणे, स्विमिंगचे प्रशिक्षण देणे, वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करणे. मॅट व मातीचे कुस्ती प्रकाराचे शिक्षण प्रशिक्षण देणे. जिम्नॅस्टीकचे प्रकाराचे शिक्षण प्रशिक्षण देणे. कुस्ती शिकविणे. सर्व प्रकारच्या खेळांना व खेळाडूंना प्रोत्साहन देणे व त्यांचे सामने भरविणे.

४) **सामाजिक :-**

सर्व प्रकारचे सामाजिक शिबिरे आयोजित करणे, बालसदन, बालसंगोपन, बालगृह, वृध्दाश्रम, अनाथाश्रम, अपंगाश्रम, विधवाश्रम, महिलाश्रम, बालकाश्रम चालविणे. दारुबंदी, हुंडाबंदी या कार्यक्रम सादर करणे, वृक्षारोपन करणे, बचत गटामार्फत महिलांच्या सबलीकरणासाठी प्रयत्न करणे. सर्वधर्मीय सार्वजनिक सामुदायीक विवाह सोहळे आयोजीत करणे. वधु - वर सुचक मंडळ सुरु करणे. धार्मीक कार्यक्रमाचे आयोजन करणे,उत्सव साजरे करणे, वधु - वर सुचक केंद्र स्थापन करुन चालविणे. एड्स जनजागृती, अंधश्रध्दा, पर्यावरण, दहशतवाद, गरीबी हटाव बद्दल जनजागृती मोहीम राबविणे व जनसामान्यात जागृती व प्रबोधन घडवुन आणणे. संस्थेच्या हिताच्या दृष्टीने तसेच गोर गरिब लोकांसाठी शासनाच्या सर्व कल्याणकारी योजना राबविणे.

अध्यक्ष [signature] उपाध्यक्ष [signature] सचिव [signature]

**५) आरोग्यविषयक :-**

वेगवेगळ्या प्रकारचे आरोग्य विषयक शिबीराचे आयोजन करणे. रक्तदान, नेत्रदान, स्त्रीभ्रूणहत्या विरोधी काम करणे इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करुन त्याचे महत्व समाजास पटवुन देणे. तसेच असंघटित महिला कामगारांच्या उपचारासाठी मोफत शिबिराचे आयोजन करणे. धर्मार्थ रुग्णालय स्थापन करुन ते चालविणे. आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार करणे. निसर्गोपचार हॉस्पीटल सुरु करणे. विविध असाध्य रोगाबाबत मार्गदर्शन जागृती आणि रोगनिदान बाबत मदत केंद्र उभे करणे. व्यसनमुक्ती केंद्र सुरु करणे. मुक बधीर, मतिमंद, अंध , अपंग, यांसाठी विविध उपक्रम राबविणे. वैद्यकिय संशोधनासाठी तज्ञ वैद्यकिय डॉक्टरांच्या सहाय्याने प्रशिक्षण केंद्र व मार्गदर्शन केंद्र सुरु करणे. गोरगरिबांच्या कल्याणासाठी विविध प्रकारचे वैद्यकीय कॅम्प सुरु करणे. सर्व प्रकारचे वैद्यकीय उपचार गोरगरिबांसाठी चालु करणे. सर्वप्रकारचे वैद्यकीय योजना राबविणे.

**६) पर्यावरण:-**

पर्यावरण समतोल राखणेसाठी शिबिरे,चर्चासत्रे, मेळावे यांचे आयोजन करुन त्यामार्फत पर्यावरणाचे महत्व पटवुन देणे. सर्व प्रकारच्या पर्यावरण विषयक योजना कार्यान्वित करणे. पशुपालनासंबंधी मार्गदर्शन करणे. प्रदुषण रोखण्यासाठी उपक्रम राबविणे. पर्यावरण, शेती, पशु-पक्षी यांची माहिती देणारे ग्रंथ जमा करुन ते इतरांना उपलब्ध करुन देणे.पशुधन संवर्धन व संरक्षण करण्यासाठी पशु पालन करणे. पशुधनाची काळजी घेण्यासाठी निरनिराळ्या शिबीर व वैद्यकिय मदत करणे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यासारख्या पारंपारिक ऊर्जेवर आधारित उपक्रम राबविणे व जनसामान्यांना त्याचे महत्व पटवुन देणेसाठी प्रात्यक्षिके व प्रशिक्षण केंद्रे सुरु करणे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावा व झाडे जगवा याचे महत्व पटवण्यासाठी जनसामान्यांना वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, औषधी वनस्पती रोपण यासाठी सर्व ते कार्य करणे व पर्यावरण टिकवण्यासाठी वृक्षाचे महत्व पटवुन त्यासाठी कार्य करणे. ध्वनी व वायु प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यकता ते जनजागृतीचे कार्य करणे. व त्या संबंधीत प्रशिक्षण व कार्यशाळा यांचे आयोजन करणे. कृषी विकास व मानवाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरणाचे महत्व पटवण्यासाठी विविध उपक्रम राबविणे. तसेच पर्यावरणासंबंधीच्या सर्व योजना राबवुन हरित क्रांती आणण्यासाठी प्रयत्न करणे.

अध्यक्ष      उपाध्यक्ष      सचिव